**डॉ.गौतम शाह धुळ्यात उपलब्ध**

गुडघे दुखी, कंबरदुखी, स्लीप डिस्क, संधीवात, सायटीका या रुग्णांवर ओझोन थेरपी व गुडघ्याची इंजेक्शन थेरपीने यशस्वी उपचार

**दि.७ सप्टेंबर ते १२ सप्टेंबर २०२६ या कालावधीत धुळे येथे उपलब्ध असणार आहेत. स.१० ते २ दु.**

संपर्क :- **डॉ.गौतम शाह M.S.** (ऑर्थो) शाह क्लिनिक श्री.विठ्ठल हॉस्पीटल, जुने आस्था हॉस्पीटल, रामवाडीसमोर, मालेगावरोड, धुळे (फोन नं.०२५६२-२३५११३)

भ्रमणध्वनी-०८६००३५१०००/९८८१२७८६९८



# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.३३६ ■ मंगळवार ८ सप्टेंबर २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

POST REGD.No./DHL/53/24-26



।। श्री गणेशाय नमः ।।

कुणाल वधवा
9765595037
9405171771

**श्रीराम बोरवेल्स**

जमीन, घर, शेती यावर
४.७५, ५ व ६ इंची बोर करुन मिळेल.
तसेच सबमर्सिबल पंप बसवून मिळेल.



१४, राधाकृष्णन शॉपींग सेंटर, झाशी राणी चौक, मनपाजवळ, धुळे


## एक पुरावा दिला तर क्षणभर पदावर राहणार नाही एम.पी.एस.सी.अध्यक्ष भीमनवार यांचे स्पष्टीकरण

**पुणे, दि. ७ : महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षांमधील कथित पेपरफुटी आणि आयोगाच्या कारभारावरून राज्यभरात विद्यार्थ्यांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. औषध निरीक्षक गट-ब परीक्षेच्या प्रश्नपत्रिका फुटल्याच्या प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर सोमवारी पुण्यात हजारो विद्यार्थ्यांनी आक्रोश मोर्चा काढला. या आंदोलनानंतर एम.पी.एस .सी.चे अध्यक्ष विवेक भीमनवार यांनी निवेदन जारी करत आपली भूमिका स्पष्ट केली आहे. आपल्यावर सातत्याने वैयक्तिक आणि प्रतिमा मलीन करणारे राजकीय आरोप केले जात असल्याचे भीमनवार यांनी म्हटले आहे. माझ्याविरोधात कुणी एक जरी पुरावा दिला तर एक क्षणसुद्धा मी या पदावर राहणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.**

**पुर्वीची पेपरफुटीची घटना**

औषध निरीक्षक परीक्षेच्या प्रश्नपत्रिका फुटीच्या प्रकरणावर स्पष्टीकरण देताना भीमनवार यांनी सांगितले की, संबंधित घटना आपण आयोगाच्या अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारण्यापूर्वीची आहे. तक्रार प्राप्त होताच आयोगाने पोलिसांत तक्रार दाखल केली असून या प्रकरणाचा तपास सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले. भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी आयोगाने उच्चस्तरीय समिती स्थापन केली आहे. राज्य सरकारनेही यासंदर्भात उच्चाधिकार समिती गठीत केली असून विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांशी चर्चा सुरू असल्याचे भीमनवार यांनी सांगितले.

**एकवीस दिवसांत निकाल जाहीर**

आपल्या कार्यकाळातील कामकाजाबाबत माहिती देताना भीमनवार यांनी आयोगात विविध गुणात्मक आणि रचनात्मक सुधारणा केल्याचा दावा केला. त्यांच्या म्हणण्यानुसार, सूत्रे स्वीकारल्यानंतर स्पर्धा परीक्षांच्या ८ आणि सरळसेवा भरतीच्या ७६ चाळणी परीक्षा, अशा एकूण ८४ परीक्षा पार पडल्या आहेत. निकाल जाहीर होण्यासाठी लागणारा कालावधी कमी करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले. सध्या १८ ते २१ दिवसांत निकाल जाहीर करणे शक्य झाले असून भविष्यात सर्व परीक्षांचे निकाल एका महिन्याच्या आत जाहीर करण्याचे नियोजन असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. एम.पी.एस.सी. ची. प्रतिष्ठा कायम राखणे आणि विद्यार्थ्यांना न्याय मिळवून देणे हा आपला प्रमुख उद्देश असल्याचेही भीमनवार यांनी म्हटले आहे.

**पुण्यात विद्यार्थ्यांचा आक्रोश मोर्चा**

दरम्यान, एम.पी.एस.सी. च्या कारभाराविरोधात पुण्यात विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने रस्त्यावर **(पान ४ वर)**

## एमपीएससी विरोधोत पुण्यात आक्रोश मोर्चा

पुणे, दि. ७ : महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कारभारातील कथित ढिसाळपणा, पेपरफुटी तसेच निकालातील गोंधळाच्या निषेधार्थ सोमवारी पुण्यात एमपीएससीच्या हजारो विद्यार्थ्यांनी भव्य आक्रोश मोर्चा काढला. विविध मागण्यांसाठी विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरून सरकार आणि आयोगाच्या कारभाराविरोधात संताप व्यक्त केला. या मोर्चात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनीही सहभाग घेत विद्यार्थ्यांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी राज्य सरकारवर जोरदार टीका केली.

मुले रस्त्यावर उतरली आहेत, तर सरकारने त्यांचे म्हणणे ऐकून घेतले पाहिजे. विद्यार्थ्यांशी चर्चेला बसले पाहिजे. विद्यार्थ्यांचा अर्धा वेळ **(पान ४ वर)**

## धनगर आरक्षण अंमलबजावणीसह विविध मागण्यांसाठी साक्रीत आक्रोश आंदोलन

**साक्री, दि.७- धनगर, ठेलारी व हाटकर समाजाच्या प्रलंबित मागण्यांकडे महाराष्ट्र शासनाचे लक्ष वेधण्यासाठी सकल धनगर, ठेलारी, हाटकर समाज, साक्री तालुका यांच्या वतीने राज्यव्यापी आक्रोश आंदोलनाचे आयोजन करण्यात आले. या समाजाच्या विविध मागण्यांसंदर्भातील निवेदन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना तहसीलदार, साक्री यांच्यामार्फत सादर करण्यात आले. या निवेदनात धनगर आरक्षणाची तातडीने अंमलबजावणी करण्याची प्रमुख मागणी करण्यात आली.**



धनगर आरक्षणाबाबत सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेल्या विशेष अनुमती याचिकेच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने ठोस व सकारात्मक भूमिका घेऊन धनगर समाजाची बाजू प्रभावीपणे मांडावी, तसेच आवश्यक कायदेशीर व घटनात्मक बाबी स्पष्ट करणारे प्रतिज्ञापत्र सर्वोच्च न्यायालयात दाखल करावे, अशी मागणी करण्यात आली. धनगर समाजास एस.टी. आरक्षणाबाबत प्रतिकूल निर्णय झाल्यास धनगरांना एस.टी. प्रमाणपत्र देण्यासाठी प्लॅन बी तयार ठेवण्याची मागणीही करण्यात आली आहे.श्री संत बाळूमामा देवस्थानासाठी स्वतंत्र कायदा करण्यात यावा, अशीही मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. देवस्थानासाठी विशेष शासकीय **(पान ४ वर)**

## सोंडले येथे बिबट्याची दहशत वाढली शेतकऱ्यांना दिवसा वीज द्या- मागणी

**सोनगीर दि.७(प्रतिनिधी)- रात्रीच्या वेळी शेतात पिकांना पाणी देण्यासाठी गेलेल्या दोन सख्ख्या भावांवर बिबट्याने अचानक हल्ला केल्याची थरारक घटना शिंदखेडा तालुक्यातील सोडले शिवारात रविवारी रात्रीच्या सुमारास घडली. या पार्श्वभूमीवर सोंडले शिवारातील कृषी वीज वापर ग्राहकांनी अधीक्षक अभियंता धुळे यांना सविस्तर निवेदन सादर करून रात्री ऐवजी दिवसा वीज पुरवठा करण्याची मागणी केली आहे.**

सोडले ता. शिंदखेडा येथील रामा सोमा ठेलारी आणि सतीश सोमा ठेलारी हे दोघे भाऊ सोडले शिवारातील आपल्या शेतात रविवारी रात्री पिकाला पाणी देण्यासाठी मोटरसायकलने जात असताना रस्त्यावर शेताच्या बांधा आड दबा धरून बसलेल्या बिबट्याने अचानक त्यांच्या दिशेने झेप घेतली. दरम्यान,आपल्या शिवारात बिबट्याचा वावर आहे याची पूर्वकल्पना दोघा भावांना असल्यामुळे त्यांनी प्रसंगावधान दाखवत बिबट्याच्या दिशेने अंगावरील चादर फेकून दिल्याने बिबट्या बिथरला आणि पळून गेला. या चतुराईमुळे दोघा भावांचे प्राण सुदैवाने वाचले असले, तरी या घटनेमुळे **(पान ४ वर)**




## धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघ
## अध्यक्षपदी प्रदिप जाधव, सचिवपदी प्रकाश चव्हाण यांची बिनविरोध निवड

**धुळे, दि.७-धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाची सर्वसाधारण सभा ६ सप्टेंबर २०२६ रोजी संपन्न झाली. सभेच्या सुरुवातीला ज्येष्ठ पत्रकार, राजकीय नेते तसेच अन्य मंडळींच्या निधनाबद्दल त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात येऊन झालेल्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.**

या सभेत धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाची नूतन कार्यकारिणी पुढीलप्रमाणे बिनविरोध निवडण्यात आली. यामध्ये अध्यक्षपदी प्रदिप पांडुरंग जाधव,उपाध्यक्ष शोभाताई आखाडे, सचिवपदी प्रकाश मनाराम चव्हाण,खजिनदार सुवर्णा मिलिंद टेंभेकर, मुंबई प्रतिनिधी जसपालसिंह सिसोदिया, नूतन कार्यकारी सदस्य **(पान ४ वर)**

## जिल्हा कारागृहातील बंदीचा रूग्णालयात मृत्यू

धुळे, दि. ७ : जिल्हा मध्यवर्ती कारागृहातील न्यायाधीन बंदी रोहीत रामनिवास यादव (वय ३५) बॅरक क्रमांक चार मध्ये होता. रविवारी (दि.६) पहाटे पहाटे साडेचारच्या सुमारास छातीत वेदना झाल्या. वैद्यकीय अधिकारी डॉ. मोहित मोरे यांना पाचारण केले. प्राथमिक तपासणीनंतर रोहित यादव यास रुग्णवाहिकेने हिरे वैद्यकीय महाविद्यालयाच्या सर्वोपचार रुग्णालयात दाखल केले. रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी डॉ. भैरव वडजे यांनी तपासणी करून मृत घोषित केले. धुळे शहर पोलिस ठाण्यात अकस्मिक मृत्यूची नोंद झाली.

## कर्जमाफी यादीतून शेतकऱ्यांची नावे वगळली काँग्रेसचे आर.सी. गावीतांचा घणाघाती आरोप

**नवापूर, दि.७ प्रतिनिधी- महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेल्या शेतकरी कर्जमाफीच्या यादीत अनेक थकबाकीदार शेतकऱ्यांची नावे वगळण्यात आल्याचा आरोप करत महाराष्ट्र प्रदेश आदिवासी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष आर. सी. गावीत यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांनी नवापूरचे तहसीलदार दत्तात्रय जाधव यांना निवेदन दिले.**

शासनाने शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी जाहीर केल्यानंतर राष्ट्रीयकृत व सहकारी बँकांकडून थकबाकीदार शेतकऱ्यांच्या याद्या शासनाकडे पाठविण्यात आल्या. मात्र, काही पात्र शेतकऱ्यांची नावे या याद्यांमध्ये नसल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी निर्माण झाली आहे. बँकांकडून काही शेतकऱ्यांना पुढील यादीत नाव येईल, अशी उत्तरे दिली जात असल्याने या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात आली. नवापूर तालुक्यातील सर्व बँकांच्या व्यवस्थापकांची तहसीलदारांच्या दालनात बैठक घेऊन शेतकऱ्यांसमक्ष चर्चा करावी आणि पात्र शेतकऱ्यांवर अन्याय होणार नाही, याची दक्षता घ्यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. अन्यथा शासनाच्या विरोधात **(पान ४ वर)**

## वरखेडेत वीज समस्या मार्गी आ.राम भदाणेंची सुचना

धुळे, दि.७- धुळेग्रामीणमधील वरखेडे शेतशिवारातील शेतकऱ्यांना गेल्या काही दिवसांपासून वीज पुरवठ्याची मोठी अडचण निर्माण झाली होती. आ.राघवेंद्र भदाणेंनी दखल घेवून संबंधित अधिकाऱ्यांना सुचना देवून तात्काळ वीज समस्या मार्गी लावल्याने समाधान व्यक्त केले जात आहे.

ट्रान्सफॉर्मर नादुरुस्त झाल्याने शेतीच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला होता. शेतकऱ्यांनी ही बाब धुळे ग्रामीणचे आ. राघवेंद्र पाटील यांच्या निदर्शनास आणताच त्यांनी तत्परता दाखवत महावितरणच्या अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. आमदार रामदादा भदाणे यांच्या पाठपुराव्यामुळे तात्काळ क्षमतेचा नवीन ट्रान्सफॉर्मर **(पान ४ वर)**

## तापी नदीतील आत्महत्या रोखण्यासाठी सावळदे येथे जनमंचचे बेमुदत उपोषण

**शिरपूर दि.७ (का.प्र.)- तालुक्यातील गिधाडे आणि सावळदे येथील पुलांवरून तापी नदीत उडी घेऊन आत्महत्या करण्याच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत असतानाही प्रशासनाकडून ठोस प्रतिबंधात्मक उपाययोजना होत नसल्याचा आरोप करीत धुळे जिल्हा जागृत जनमंचच्या संस्थापिका डॉ. सरोज पाटील यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी सात सप्टेंबरपासून सावळदे येथे पुलाशेजारी बेमुदत उपोषण सुरू केले आहे.**

तापी नदीतील आत्महत्यांच्या वाढत्या घटनांमुळे गिधाडे व सावळदे येथील पूल सुसाईड पॉइंट बनत असल्याची गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. गेल्या आठवडाभरात दररोज सरासरी एक आत्महत्या झाल्याचा दावा जनमंचने केला आहे. या पार्श्वभूमीवर जनमंचच्या वतीने सार्वजनिक बांधकाम विभागाला निवेदन देण्यात आले होते. मात्र, आत्महत्या रोखण्यासाठी अद्याप ठोस उपाययोजना झाल्या नसल्याने जनमंचने आंदोलनाचा मार्ग स्वीकारला आहे. संवेदनशील ठिकाणी प्रतिबंधात्मक सुरक्षा व्यवस्था उभारणे **(पान ४ वर)**

## सावळदे गावात शिपायाला मारहाण

शिरपूर दि.७(का.प्र.): तालुक्यातील सावळदे येथील बस स्टँडजवळ ग्रामपंचायत शिपायाला चाकू व लोखंडी कड्याने मारहाण झाल्याची घटना चार सप्टेंबरला घडली असून तीन जणांविरोधात शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. जखमी विनोद रतन सोनवणे (वय ३०) याने दिलेल्या फिर्यादीनुसार, त्याने संशयितांना रस्त्यावर आरडाओरड व शिवीगाळ का करता असे विचारल्याचा राग आल्याने संशयितांनी त्याला मारहाण केली. जितेंद्र सुकलाल कोळी, ओम जितेंद्र कोळी व लकी जितेंद्र कोळी (सर्व रा.सावळदे) यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून **(पान ४ वर)**

## हा.ज़मीर अ.मुल्ला सर फाऊंडेशन धुळे विविध कार्यक्रम मोठ्या उत्साहात सपन्न

**धुळे, दि.७- हाजी ज़मीर अहमद मुल्ला सर फाऊंडेशन मौलवी गंज धुळेने ६ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी ३.३० वाजता, मुनिस अनीस अहमद साहेब यांच्या अध्यक्षतेखाली, मुस्लिम नगर धुलिया येथील नॅशनल उर्दू स्कूलजवळ असलेल्या काशाना-ए-जमीर, अन्सार हॉल येथे कार्यक्रम घेण्यात आला. यामध्ये १५ ऑगस्ट २०२६ रोजी झालेल्या देशभक्तीवर फलक लेखन स्पर्धेचा निकाल, सेवानिवृत्त शिक्षकांचा सत्कार आणि अन्सार हॉलचे उद्घाटन करण्यात आले. या**

कार्यक्रमाची सुरुवात हाफिज फहद इक्बाल यांनी कर अन मजीद व फुरकान समीरच्या पठणाने केली. दिवंगत डॉ. मोहम्मद सलीम अन्सारी यांचे



नातू मोहम्मद हस्सान फहीम अहमद यांनी आका-ए-नामदार मदीने के ताजदार सरकार-ए-आलम नूरे मुजस्सिम हज़रत मोहम्मद सलल्ललाहो अलैही व सल्लम त्यांच्या पवित्र दरबारात नात सादर करण्याचा सन्मान मिळाला.

अकील अहमद यांनी उपस्थितांना फाऊंडेशन व समारंभाची उद्दिष्ट्ये आणि ध्येये समजावून सांगितली. ३० ऑगस्ट २०२६ रोजी, आपल्या कर्तव्यातून निवृत्त झालेले शिक्षक ज़ाकीर शाह (बी. के. शेख उर्दू हायस्कूल) यांना शब्बीर शाकिर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या प्रसंगी ज़ाकीर शाह यांनी जमीर अहमद मुल्ला सर फाऊंडेशनच्या या उपक्रमाचे कौतुक केले आणि भविष्यात संस्थेसोबत **(पान ४ वर)**

## सबमर्सिबल केबल मोटारींची चोरी

शिरपूर दि.७ (का.प्र.) : तालुक्यातील जावखेडा व लोंढे परिसरातील शेतांमधून सबमर्सिबल तांब्याच्या केबल (वायर) तसेच विद्युत मोटारी चोरीला जाण्याच्या घटना घडल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंता व्यक्त होत आहे. याप्रकरणी जावखेडा येथील विनोद देवीदास भामरे यांच्यासह सुमारे २० ते ३० शेतकऱ्यांनी शिरपूर शहर पोलिस ठाण्यात लेखी तक्रार देऊन चोरट्यांचा शोध घेऊन कारवाई करण्याची मागणी केली आहे.

तक्रारीनुसार, जावखेडा व लोंढे परिसरातील शेतांमध्ये शेतकरी स्वतः शेती करीत असून, तापी नदीच्या काठावरील शेतांमध्ये विद्युत जलपरी मोटार व बोअरवेल मोटार बसविण्यात आलेल्या आहेत. या मोटारींपासून विद्युत कनेक्शन जोडण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या सबमर्सिबल तांब्याच्या केबल यापूर्वीही चोरीला गेल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. **(पान ४ वर)**



## शहाद्यात दोन कोटींच्या विकासकामांचे आ.राजेश पाडवींच्या हस्ते भूमिपूजन

**शहादा,दि.०७ (का.प्र.)- महाराष्ट्र राज्य शासनाच्या अल्पसंख्यांक विभाग योजनेअंतर्गत शहादा शहरातील दादावाडी परिसरात पेवर ब्लॉक बसवणे व शहरातील विविध ठिकाणी रस्ते व विकासकामांचे भूमिपूजन शहादा-तळोदा विधानसभेचे आ.राजेश पाडवी यांच्या हस्ते उत्साहात पार पडले. धार्मिक व सामाजिक स्थळांच्या मूलभूत विकासासाठी सुमारे दोन कोटी रुपयांचा निधी आ.पाडवी यांच्या पाठपुराव्यातून उपलब्ध झाल्याने जैन भाविक व शहादा शहरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.**

शहादा शहरामधील डोंगरगाव रस्त्यालगत असलेल्या श्री जीन कुशल सूरि संस्थानाच्या मसुघोषा घंटा दादावाडीफ परिसर भागात पेवर ब्लॉक बसवणे व नवीन वसाहतींमधील रस्त्यांच्या सुमारे दोन कोटी रुपयांच्या कामांचा शुभारंभ **(पान ४ वर)**

## गणपती उत्सव मंडपाच्रा भूमीपूजन सोहळा संपन्न

धुळे, दि.७- शहरातील गल्ली नंबर पाच मधील जय जवान चौकात सालाबदाप्रमाणे गणपती उत्सव मंडपा चे भूमिपूजन संस्थापक अध्यक्ष भगवान चौधरी यांच्या हस्ते करण्यात आले

गेल्या ४० वर्षापासून गल्ली नंबर पाच मधील जय जवान चौकात गणपती उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात येतो. यावेळी गणपती उत्सवानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. महिलांसाठी स्पर्धा, बालगोपालांसाठी स्पर्धा वेगवेगळे विषय घेऊन सजीव देखावे साजरे करण्यात येणार आहे

कार्यक्रमासाठी अध्यक्ष प्रशांत बोरसे उपाध्यक्ष **(पान ४ वर)**

## धुळे जि. हमाल कामगार संघटनेचा मागण्यासाठी १८ सप्टेंबरला बेमुदत धरणे आंदोलनाचा इशारा

**धुळे, दि.७- थेट वाहतूक धोरणाची अंमलबजावणी त्वरित थांबवावी आणि माथाडी कामगारांच्या विविध प्रलंबित मागण्या त्वरित मंजूर कराव्यात, या मागणीसाठी धुळे जिल्हा हमाल कामगार संघटनेच्या वतीने येत्या सप्टेंबर पासून तहसील कार्यालय, धुळे येथे बेमुदत धरणे आंदोलन करण्याचा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. यासंदर्भात संघटनेने जिल्हाधिकारी तसेच तहसीलदारांना निवेदन सादर केले आहे.**

शासनाने थेट वाहतूक धोरण राबवण्याचा निर्णय घेतला असला तरी राज्यातील बहुतांश राज्यांनी हे धोरण अद्याप स्वीकारलेले नाही. असे असतानाही महाराष्ट्रात टप्पा व टप्पा मध्ये थेट वाहतूक धोरणाची जबरदस्तीने अंमलबजावणी केली जात आहे. यामुळे गोदामांमध्ये वर्षानुवर्षे काम करणाऱ्या नोंदणीकृत माथाडी कामगारांचा रोजगार धोक्यात आला असून हजारो कामगार बेरोजगार होण्याच्या मार्गावर आहेत, असा आरोप संघटनेने केला आहे.

कामगारांच्या प्रमुख मागण्यामध्ये थेट वाहतूक धोरण रद्द करा: थेट वाहतुकीचे धोरण तात्काळ रद्द करून पूर्ववत कामगारांमार्फतच गोदामातील धान्याची हाताळणी व वाहतूक करण्यात यावी. माथाडी दरमहा मंजुरी द्यावी, मंडळाने निश्चित केलेल्या दरानुसार लेव्हीसह माथाडी कामगारांचे पैसे ठेकेदारांकडून वसूल करून कामगारांना वेळेवर देण्यात यावेत. महागाई निर्देशांकाचा फरक द्यावा: शासनाने मान्य केलेला महागाई निर्देशांकाचा फरक ठेकेदारांना देण्याऐवजी थेट माथाडी मंडळाकडे वर्ग करून कामगारांना **(पान ४ वर)**




## भरत गावित यांच्या प्रयत्नाला यश
## कोरोना काळापासून बंद असलेली नवापूर देवमोगरा एसटी पुन्हा सुरू

**नवापूर, दि.७ (प्रतिनिधी)– कोरोना काळापासून बंद असलेली नवापूर ते देवमोगरा एसटी बससेवा अखेर सोमवार, दि.७ सप्टेंबर २०२६ पासून पुन्हा सुरू करण्यात आली. नवापूर आगाराच्या वतीने सुरू करण्यात आलेल्या या बससेवेचा शुभारंभ राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे ज्येष्ठ नेते भरत गावीत यांच्या हस्ते श्रीफळ फोडून करण्यात आला.**

यावेळी नगराध्यक्ष जयवंत जाधव, उपनगराध्यक्ष नरेंद्र नगर–ाळे, नगरसेवक मनोहर गावीत, नगरसेवक अल्तमस खाटीक, माजी उपनगराध्यक्ष फारुक शाह, एस.बी. अहिरे, नवापूर आगार प्रमुख सौरभ रत्नपारखी, जालमसिंग गावीत, प्रकाश गा–वीत, वाहतूक निरीक्षक यशोवर्धन नगराळे, सहायक वाहतूक निरीक्षक धनराज भोये, वरिष्ठ लिपिक प्रवीण गागुर्डे, व्ही.एम. गावीत, वाहतूक नियंत्रक मयूर वाडेकर, लिपिक एस.आर. गा–वीत, एसटी वाहक प्रविण वसावे, एसटी चालक पी.वाय. नाईक तसेच रमीज काझी आदी उप–स्थित होते.

कोरोना काळापासून नवापूरदेवमोगरा बस बंद असल्याने देवमोगरा येथे दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांसह नागरिकांची मोठी गैरसोय होत होती. देवमोगरा येथे आदिवासी समाजाची कुलदेवता देवमोगरा मातेचे प्रसिद्ध मंदिर असल्याने नंदुरबार जिल्ह्यासह परिसरातून मोठ्या संख्येने भाविक दर्शनासाठी जात असतात. बससेवा बंद असल्यामुळे त्यांना खासगी वाहनांवर अवलंबून रा–हावे लागत होते. ही अडचण लक्षात घेऊन भरत गावीत यांनी एसटी महामंडळाकडे सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या पाठपुराव्याला **(पान ४ वर)**

## मनपाचे मुलींच्या सुरक्षित आरोग्यासाठी एचपीव्ही लसीकरण; उत्स्फूर्त प्रतिसाद

**धुळे, दि.७– भविष्यातील गंभीर आजारांपासून मुलींचे संरक्षण व्हावे, या उद्देशाने धुळे महानगरपालिकेमार्फत शहरा–तील १४ वर्षे पूर्ण झालेल्या व १५ वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलींसाठी एचप–व्ही लसीकरणाची विशेष मोहीम सुरू करण्यात आली आहे. महानगरपालिकेच्या पाच दवाखान्यांमध्ये सुरू असलेल्या या लसीकरण मोहिमेला विद्यार्थिनी तसेच पालकांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे.**

शासनाच्या मार्गदर्शनानुसार शहरातील विविध शाळांमध्ये सर्वेक्षण करून लोकसंख्येच्या प्रमाणात या वयोगटातील एकूण ३,८७३ मुलींची संख्या निश्चित करण्यात आली आहे. त्यापैकी आतापर्यंत ४१७ विद्यार्थिनींचे एचपीव्ही लसीकरण पूर्ण झाले आहे.

एचपीव्ही विषाणूपासून होणाऱ्या संसर्गामुळे भविष्यात महिलांमध्ये गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग होण्याचा धोका निर्माण होऊ शकतो. हा धोका कमी करण्यासाठी **(पान ४ वर)**


**दिपक ज्वेलर्स**

सोने- 22 K -1,41,300 रु.+3% GST
सोने- 24 K -1,53,500 रु.+3% GST
चांदी- 2,37,500 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

# आपला महाराष्ट्र

## उभा अक्राळ विक्राळ, दारी दुष्काळ दुष्काळ

मराठा आरक्षणाच्या मागणीतील सर्व त्रुटी दूर करून ५१ लाख नोंदी असणाऱ्यांना प्रमाणपत्र द्या, शिंदे समितीला मुंबईत स्वतंत्र कार्यालयाची जागा द्या अशा मागण्यांसाठी मनोज जरांगे पाटील यांनी अंतरवाली सराटीत उपोषण आरंभले आहे. जोपर्यंत या मागणीवर अंमल होत नाही तोपर्यंत उपोषण सुरूच राहणार असे जरांगे पाटील यांनी म्हटले आहे. जरांगे यांचे उपोषण आणि सरकारची नेहमीप्रमाणे हत्ती चाल. छोट्या छोट्या मागण्यासाठी नेहमी चालू असलेली उपोषणे आणि सरकारची आस्ते कदम वाटचाल असे सध्या अस्वस्थ महाराष्ट्रात चालू आहे. अस्वस्थ यासाठी की, असंख्य घडामोडी, त्यात गुंतलेले काही टक्के व्यवस्थेतील लोक, ऊस नाही, साखरेचे उत्पादन घटले तरीही सहकारी साखर कारखान्यांना दोन हजार कोटींचे कर्ज देण्याची सरकारची तयारी. राम मंदिर न्यासाचे नवे कार्यकारी अधिकारी यांची नियुक्ती, दिशा सालियन मृत्यू प्रकरणाची सीबीआय चौकशी करण्याचे उच्च न्यायालयाचे आदेश, डीजे विरोधातला प्रचंड आवाज, रस्त्यावर त्यासाठी मोर्चे, तशी मागणी करणाऱ्या बापट यांना मारहाण. मारहाणीचे समर्थन करणारे गोबरपट्ट्याचे वारकरी, आमदाराच्या वाहनाच्या क्रमांकाकडे लक्ष वेधून घेणाऱ्याला तुरुंगवास, असे सगळे एकीकडे, त्या बातम्यांनी वृत्तपत्रे आणि चॅनेल खचाखच भरलेले अशी अवस्था. तर दुसरीकडे पावसाच्या ओढीमुळे सैरभैर झालेला आणि चिंताग्रस्त झालेला महाराष्ट्रातील शेतकरी तसेच त्याच्यावर अवलंबून असणाऱ्या घटकांची होणारी दीन अवस्था अशी महाराष्ट्रातील सध्या परिस्थिती आहे. येत्या आठवडाभरात पाऊस जर आला नाही तर शेतामध्ये सिंचनाची व्यवस्था असल्याचे अपवाद सोडून करपलेले पिकांचे दृश्य डोळ्यांना पाणी आणणारे असेल. १९६६,१९७२, आणि त्यानंतर सातत्याने पडलेले अनेक दुष्काळ यापेक्षाही यंदाचा दुष्काळ भीषण असेल. पण त्याविषयी कसलाही विचार न करणारी यंत्रणा आणि सत्तेतील कथित लोकप्रतिनिधी हे सगळे रोजच्या राजकारणात मशगुल आहेत.

महाराष्ट्रातील २८ जिल्ह्यात पावसाचा अभाव आहे. कोकण विभागात ९६ टक्के पाऊस पडला. नाशिक विभागात त्याची टक्केवारी ७४ आहे. पुणे विभागात ७३ टक्के पाऊस पडला. मराठवाड्यात ७४ टक्के, अमरावतीत ७८ तर नागपूर मध्ये ७२ टक्के पावसाची नोंद झालेली आहे. पिके ऐन भरात आलेली असताना १४ टक्के पावसाची तूट देशाच्या अर्थव्यवस्थेच्या मुळावर उठलेली आहे. गेल्या वर्षी एक जून ते ३१ ऑगस्ट या काळात ८२४ मिलिमीटर पाऊस होता यंदाही तेवढा अपेक्षित होता परंतु तो प्रत्यक्षात कमी झाला. त्यामुळे विदर्भ आणि मराठवाड्यातील तसेच पश्चिम महाराष्ट्रातील पर्जन्यछायेच्या प्रदेशात पावसाअभावी पिके करपू लागलेली आहेत. कोकणात काही जिल्ह्यात सरासरी इतका पाऊस झाला. त्यासह धुळे, जळगाव, सातारा, सांगली, छत्रपती संभाजी नगर, जालना, नांदेड, हिंगोली, बुलढाणा या जिल्ह्यात गेल्या महिन्यात समाधानकारक पाऊस झाला. तोही सरासरी इतका होता मात्र आता परिस्थिती बदलली आहे. बुलढाणा, धुळे, जळगाव जिल्ह्यातील पिके करपू लागलेली आहेत. परवा बुलढाणा जिल्ह्यात केंद्रीय मंत्र्यांनी पीक पाहणी केली तेव्हा त्यांच्या लक्षात आले की पाऊस फारच गरजेचा आहे अन्यथा डोळ्यातून पाणी निघेल. खानदेशातही तीच परिस्थिती आहे. सांगली आणि साताऱ्यात गेली दोन वर्षे अति पावसामुळे पुराने थैमान घातले होते परंतु आता सांगलीत दुष्काळाची छाया आहे. एखादा दुसरा तलाव भरला परंतु बाकीचे तलाव आणि धरणे कोरडे आहेत. इतका असमतोल जास्तीत जास्त पाऊस पडणाऱ्या जिल्ह्यांमध्ये यंदा आहे. हा सगळा अल नॅनो चा पराक्रम आहे.

कर्नाटकात सरकारने कृत्रिम पाऊस पाडण्याचा प्रयोग केला आणि आपले सरकार याबाबत ब्र शब्द बोलत नाही. ढग येतात, स्थिरावतात पण पाऊस पडत नाही. यावर्षी अशीच परिस्थिती राहिल्यास पुढच्या वर्षी जून सुरू होईपर्यंत कसे दिवस निघतील असा प्रश्न आहे. राजकारण चालूच राहील पण त्याला आता फार महत्त्व द्यायचे नाही आता आपण सगळे मिळून शेतकऱ्यांच्या आणि त्याच्यावर अवलंबून असलेल्या सर्व घटकांच्या हिताचे निर्णय घेऊ या असा विचार सरकारात बसलेल्यांपैकी कोणीही करीत नाही हे या महाराष्ट्राचे दुर्दैव म्हणावे लागेल. श्रावण महिना सरसर येणाऱ्या शिरव्यांचा असतो. परंतु यावर्षी पूर्ण श्रावण संपला पण तुषार काही बरसले नाहीत. त्यामुळे कविताही प्रसवल्या नाहीत. बालकवींच्या कवितेतला श्रावण आता दिसत नाही.

कितीक त्या विजा,पेटताना विझलेल्या, आणि किती किती सरी,येता येता थिजलेल्या,किती हुंदके दाटले वसुधेच्या मिट्ट ओठी, मेघ कितीक गोठले, आत आभाळाच्या पोटी,रुक्ष कोरडाच गेला, आषाढाला नाही ओल,ऊन पाऊस खेळेना, श्रावणाचा गेला तोल, उसवेना ते आभाळ,थेंबा थेंबाची आबाळ,उभा अक्राळ विक्राळ,दारी दुष्काळ दुष्काळ अशा वास्तववादी परिस्थितीची आठवण करुन देणारी ही कविता आहे.अशा अनेक कविता आता प्रसवतील. जुलै महिन्यात पुरेसा पाऊस झाल्याने मुंबई महानगरला पाणीपुरवठा करणारे तलाव काठोकाठ भरले. त्यामुळे मुंबईकरांची चिंता मिटली. मुंबईचे भागले म्हणून महाराष्ट्राचेही भागले असा काहीसा समज धोरणकर्त्यांचा असतो. मुंबईला जर टंचाई निर्माण झाली असती तर मुंबईकरांनी ओरडाआरडी केली असती. आणि यंत्रणा वेगाने हलली असती. आता तसे काहीही होणार नसल्यामुळे महाराष्ट्रातील परिस्थिती संबंधीचा निर्णय होत नाही. २८ जिल्ह्यातील पिण्याच्या पाण्याच्या पुरवठ्याचे काय करणार हा फार मोठा प्रश्न आहे. खानदेशात म्हणजे जळगाव आणि धुळे नंदुरबार जिल्ह्यात तापी नदीवरील प्रकाशा, सारंगखेडा, शिंदखेडा तालुक्यातील बॅरेज प्रकल्प भरलेले आहेत. तद्वतच भुसावळचा शेळावे प्रकल्प आहे. अमळनेर तालुक्यातील पाडळसरे प्रकल्प अजून ठिकाणावर नाही. तरीही या दोन जिल्ह्यांची पाणीपुरवठ्याची समस्या सुटली असे म्हणायला हरकत नाही. हातनुर धरण, भुसावळ बॅरेज, यांची क्षमता चोपडा रावेर भुसावळ तालुके आणि जळगाव शहर तसेच तापी काठावरील गावांचा प्रश्न सुटेल एवढी आहे. दोन्ही काठावरील पिकांना देखील जीवदान मिळू शकते. तीच अवस्था धुळे आणि नंदुरबार जिल्ह्यातील आहे. नंदुरबार जिल्ह्यातील शहादा नंदुरबार, धुळे जिल्ह्यातील शिंदखेडा, दोंडाईचा शिरपूर आणि धुळे शहर पाणीपुरवठ्याच्या संदर्भात स्वायत्त झाले आहेत. दोन्ही काठावरील लहान मोठ्या गावांचे देखील पाण्याच्या संदर्भातील प्रश्न संपलेले आहेत. जर सरकारने मनावर घेतले आणि बंद उपसा सिंचन योजना चालू केल्या तर कुठलाच प्रश्न शिल्लक राहणार नाही. राजकीय इच्छाशक्तीचा अभाव असल्यामुळे ते होत नाही. असे सगळ्याच जिल्ह्यांच्या संदर्भात होत आहे. हे मूलभूत प्रश्न असले तरी त्यावरची चर्चा न करता जे मुद्दे गैर लागू आहेत आणि दैनंदिन जीवनाशी संबंधित नाही त्यावरच चर्चा अलीकडे होते. त्यातल्या त्यात जी राजकीय व्यवस्था वर आणि खाली आहे त्यांच्या सत्ता काळात अशाच मुद्द्यांना प्राधान्य दिले जाते असे नाईलाजाने म्हणणे भाग आहे. मात्र उर्वरित जिल्ह्यात कोरडवाहू चे जे क्षेत्र आहे ते पूर्णपणे पावसाअभावी कोलमडून पडेल आणि त्या लोकांना मोठ्या दुष्काळाशी सामना करावा लागेल. लोकांचा आणि जनावरांचा जगण्याचा मुद्दा फार महत्त्वाचा आहे. प्रशासकीय यंत्रणा मात्र त्याविषयी काही बोलत नाही. कुठलीच हालचाल करताना दिसत नाही. संपूर्ण महाराष्ट्रात डीजे विरोधी सूर उमटत असताना अनेक ठिकाणच्या जिल्हाधिकाऱ्यांनी आणि पोलिसांनी डीजेवर बंदी आणली आहे. इथे मात्र प्रशासन मख्ख आहे. लोकप्रतिनिधी डीजेचे समर्थन करताना दिसतात. अशा प्रकारचे निर्णय घ्यायचेच नाहीत असे ठरले असल्यास दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर देखील काहीही होणार नाही असे नाईलाजाने म्हणणे भाग आहे. वेळेवर धावपळ, बैठका, शेवटी पाण्याचे टँकर आणि टँकर माफीये यांचे उखळ पांढरे करण्याचे निर्णय घेतले जातात. त्या आधीच नियोजन झाले पाहिजे अशी अपेक्षा आहे.

## दोंडाईचात सत्तावीस आदर्श शिक्षकांचा ना.जयकुमार रावल यांच्याहस्ते गौरव

दोंडाईचा, दि.७- शिक्षक हे विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान देत नाहीत, तर त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करून जीवनाला योग्य दिशा देतात. आई-वडिलांनंतर विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून शाळांमधून चांगल्या विद्यार्थ्यांसोबतच संवेदनशील, जबाबदार आणि कर्तव्यदक्ष नागरिक घडविण्याचे काम शिक्षकांनी करावे, असे प्रतिपादन राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री तथा धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांनी केले. दोंडाईचा-वरवाडे नगरपरिषद प्राथमिक शिक्षण मंडळाच्या वतीने शिक्षक दिनानिमित्त आयोजित आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी शहरातील विविध शाळांमध्ये उल्लेखनीय शैक्षणिक कार्य करणाऱ्या शिक्षकांचा पालकमंत्री श्री. रावलयांच्या हस्ते आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी पालकमंत्री श्री. रावल यांनी माजी राष्ट्रपती तथा थोर शिक्षणतज्ज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांना अभिवादन करून सर्व शिक्षकांना शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

शिक्षक दिन हा केवळ पुरस्कार प्रदान करण्याचा दिवस नसून भावी पिढी आणि पर्यायाने समाज घडविणाऱ्या शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस असल्याचे त्यांनी सांगितले.



दोंडाईचा शहरातील प्रत्येक शाळेतून उल्लेखनीय कार्य करणाऱ्या एका शिक्षकाची निवड करून त्यांचा गौरव करण्याचा नगरपरिषदेचा उपक्रम कौतुकास्पद असल्याचे नमूद करून पालकमंत्री श्री. रावल म्हणाले की, एका शिक्षकाचा गौरव हा संपूर्ण शिक्षकवर्गाच्या कार्याचा सन्मान आहे. शिक्षण क्षेत्रात तंत्रज्ञान, डिजिटल माध्यमे आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर वेगाने वाढत असला, तरी विद्यार्थ्यांना संस्कार, मूल्ये आणि योग्य दिशा देण्यात शिक्षकांची भूमिका कायमच महत्त्वपूर्ण राहणार आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षक, पालिका आणि शिक्षण विभागाने समन्वयाने काम करावे. शाळांमधून गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबतच सामाजिक जाणीवअसलेली आणि जबाबदार पिढी घडविणे हे आपले सामूहिक उद्दिष्ट असले पाहिजे, असेही पालकमंत्री श्री. रावल यांनी सांगितले. पुरस्कारप्राप्त शिक्षकांचे अभिनंदन करताना हा सन्मान त्यांना भविष्यात आणखी उत्कृष्ट कार्य करण्यासाठी प्रेरणा देईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. आदर्श शिक्षकांचा गौरव यावेळी प्रदीप शिवदास पाटील, शेख साजिद दाऊद खाटीक, मनीषा श्रीराम पाटील, संजय सुकनंदन चौधरी, हबीबु रेहमान हुसेन अहमद अन्सारी, संदीप रामा ईशी, मनीषा मधुकर बंजारा, शेख मुश्ताक शेख कमरुद्दीन, दीपक आधार कोल्हाटी, संगीता पाडवी, शेख तौफिक अहमद शेख रफिक, प्रदीप नामदेव सूर्यवंशी, भाऊसाहेब गोरेख पाटील, निळकंठ देविदास कुलकर्णी, मनोजकुमार ठाकूर, ललित संतोष कंवर, उर्मिला रविंद्र पाटील, प्रविण दिगंबर माळी, सचिन पाटील, सुंदरी विघ्नेश अबीरामी, सुचिता भट्ट पवार, फरहाना तसवर पिंजारी, जयसिंग हिम्मतसिंग गिरासे, अशोक खंडू सावंत, सुरेंद्रसिंग दौलतसिंग गिरासे, कोंकेंद्र ताराचंद वाडीले आणि मनीषा तानाजी घुगे यांचा आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरव करण्यात आला. कार्यक्रमास उपनगराध्यक्ष विजय पाटील, शिक्षण सभापती वैशाली कागणे, भाजपचे दोंडाईचा शहराध्यक्ष जितेंद्र गिरासे, प्रवीण महाजन, कृष्णा नगराडे, जितू गिरासे, भैया धनगर, अक्षय चव्हाण, सचिन सोनवणे, संजय रामोळे, निखिल राजपूत, बांधकाम सभापती मुकेश देवरे, माजी नगराध्यक्ष रमेश कुकरेजा, भरत ठाकूर, राकेश अग्रवाल, माजी नगराध्यक्ष विक्रम पाटील, मुख्याधिकारी देवेंद्र परदेशी, हितेंद्र महाले यांच्यासह शिक्षक, शिक्षण विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते पुरस्कारप्राप्त शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. शिक्षकांच्या उल्लेखनीय शैक्षणिक व सामाजिक कार्याचा

## वर्गणीच्या नावाखाली खंडणी, गुन्हा दाखल

शिरपूर दि.७ (का.प्र.)- हार्डवेअर दुकानदाराकडे पाच हजार रुपयांची देणगी मागून कटर व कोयत्याचा धाक दाखवून साडेपाच हजार रुपयांची जबरी चोरी केल्याच्या संशयावरुन एकाविरोधात शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

सचिन भटू सोनार (वय ३९ वर्ष, रा.शिवपार्वती कॉलनी, शिरपूर) यांनी शहर पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार, पाच सप्टेंबरला दुपारी साडेबाराला संशयित भटू तुकाराम कोळी (रा. वाल्मिक नगर, शिरपूर) त्याच्याकडे राम हार्डवेअर या दुकानात गेला. करवंद नाका येथील एसडीएम फाऊंडेशनच्या गणेशोत्सवासाठी पाच हजार रुपयांची देणगी पावती द्यावी लागेल असे त्याने सांगितले. त्यानंतर लोखंडी कटर व कोयता सचिन सोनारच्या पोटाला लावला. त्याच्या वडिलांना धक्काबुक्की व शिवीगाळ करुन गल्ल्यातून साडेपाच हजार रुपये काढून घेतले. संशयिताविरोधात शहर पोलिसांनी जबरी चोरीचा गुन्हा दाखल केला असून सहायक निरीक्षक सतीश भांड तपास करीत आहेत.

## शहाद्यात विविध पक्षांतील कार्यकर्त्यांचा आ.रघुवंशींच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश

शहादा,दि.०७(का.प्र.)– तालुका व शहरातील विविध पक्षांच्या पदाधिकारी आणि शेकडो सक्रिय कार्यकर्त्यांनी शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. शिवसेना हा गोर–गरीब व सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांसाठी लढणारा पक्ष असून, शहादा तालुक्यात पक्षाचे संघटन जोमाने वाढत आहे. आगामी काळात जिल्ह्याच्या राजकारणात शिवसेना महत्त्वाची भूमिका बजावेल, असा विश्वास शिवसेना नेते तथा आमदार चंद्रकांत रघुवंशी यांनी व्यक्त केला.



शहादा येथील शिवसेना जनसंपर्क कार्यालयात आयोजित पक्षप्रवेश सोहळ्यात ते बोलत होते. शिवसेनेचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे, युवा नेते खासदार श्रीकांत शिंदे, आमदार चंद्रकांत रघुवंशी, आमदार आमश्या पाडवी, माजी आमदार शिरीषदादा चौधरी तसेच शिवसेना जिल्हाप्रमुख रामभैय्या रघुवंशी यांच्या कार्याने प्रभावित होऊन नांदिया, तलावडी, दुधखेडा, कुसुमवाडा व शहादा येथील विविध पक्षांच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला.यावेळी आमदार चंद्रकांत रघुवंशी, शिवसेना जिल्हाप्रमुख ॲड. रामभैय्या रघुवंशी, शहादा तालुकाप्रमुख मनलेश जायसवाल, शहादा शहरप्रमुख जितेंद्र जमदाडे, महिला सेनेच्या जिल्हाप्रमुख सौ. ज्योतीताई राजपूत, युवा सेनेचे जिल्हाप्रमुख मोहितसिंग राजपूत, ज्येष्ठ नेते जहीर शेख, सुपडू खेडकर, शेतकरी सेनेचे नगिनभाई पाटील, सचिन पाटील, काशिनाथ पाटील, डॉ.राजेंद्र पेंढारकर, सौ. संगीता पवार, नंदाताई सोनवणे, भावना लोहार, गायत्री भामरे आदी उपस्थित होते.तालुक्यातील सुजित शेवाळे, कैलाश पवार, श्रवण सुळे, दिलीप पवार, प्रवीण शिंपी, धरमसिंग पवार यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला. आमदार चंद्रकांत रघुवंशी व जिल्हाप्रमुख ॲड. रामभैय्या रघुवंशी यांच्या हस्ते नव्याने प्रवेश केलेल्या कार्यकर्त्यांच्या गळ्यात शिवसेना पक्षाचा गमछा टाकून त्यांचे स्वागत करण्यात आले.

यावेळी बोलताना आमदार रघुवंशी यांनी सांगितले की, शिवसेना हा सर्वसामान्यांच्या समस्या सोडविण्यासाठी काम करणारा पक्ष आहे. शहादा तालुका व शहरातील पदाधिकारी सर्वसामान्य कुटुंबातून आलेले असून, जनतेच्या प्रश्नांवर सातत्याने काम करीत आहेत. त्यामुळे तालुक्यात शिवसेनेला मोठा प्रतिसाद मिळत असून आगामी काळात संघटन अधिक मजबूत होईल.हा पक्षप्रवेश सोहळा शिवसेना जिल्हाप्रमुख रामभैय्या रघुवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच शहादा तालुकाप्रमुख मनलेश जायसवाल यांच्या विशेष प्रयत्नातून आणि शहरप्रमुख जितेंद्र जमदाडे व जयसिंग ठाकरे यांच्या सहकार्याने यशस्वी झाला. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी हितेंद्र वर्मा, गोपाल कोळी, हेमंत सूर्यवंशी, जगदीश पाटील, महेश पाटील, एकनाथ ठाकरे, लक्ष्मण पवार, मुरलीधर वळवी, कौतुभ मोरे, ॲड. लव लोहार, धनराज जायसवाल, दीपक मोरे, राकेश पाटील, सागर चौधरी, योगेश कोठारी, मनोज बेदमुथा आदींनी परिश्रम घेतले.

यावेळी शहादा तालुकाप्रमुख मनलेश जायसवाल यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शहादा शहरप्रमुख जितेंद्र जमदाडे यांनी केले, तर सूत्रसंचालन ॲड. भोजेंद्र शिंदे यांनी केले. यावेळी युवा सेनेचे राजरत्न बिरारे, जगदीश पवार, प्रवीण सैंदाणे, गुलाब सुतार यांच्यासह मोठ्या संख्येने शिवसेना पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते.

## पोलीस दलातर्फे सत्तेचाळीस दात्यांचे उत्स्फुर्त रक्तदान

नंदुरबार, दि.५(प्रतिनिधी)- जिल्ह्यातील गरजू रुग्णांना रक्ताचा तुटवडा भासू नये, यासाठी नंदुरबार जिल्हा पोलिस दलाच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात पोलिस अधिकारी, कर्मचारी तसेच नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत ४७ रक्तदात्यांनी रक्तदान केले.जिल्हा शासकीय रुग्णालय, नंदुरबार येथे रक्तकेंद्र कार्यरत असून विविध आजारांच्या रुग्णांना रक्ताची आवश्यकता असते. गोरगरीब व गरजू रुग्णांसह सिकलसेल, थॅलेसेमिया, कुष्ठपीडित, गर्भवती माता, अपघातग्रस्त आणि इतर रुग्णांना रक्ताची गरज भासते. जिल्ह्यात एकच शासकीय रक्तपेढी असल्याने रक्ताचा पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी रक्तदान शिबिरांचे आयोजन आवश्यक असल्याचे पोलिस प्रशासनाने स्पष्ट केले.२ सप्टेंबर रोजी सकाळी ८ वाजता नंदुरबार पोलिस मुख्यालय येथे हे रक्तदान शिबिर घेण्यात आले. पोलिस अधीक्षक अश्विनी सानप यांनी रक्तदात्यांशी संवाद साधत रक्तदान हे श्रेष्ठदान असून एका रक्तदात्याच्या योगदानामुळे अनेक गरजू रुग्णांना जीवनदान मिळू शकते, असे सांगितले.पोलिस उपअधीक्षक अशोक कडलग, पोलिस निरीक्षक विवेक पाटील, रा.पो.नि. किसन राठोड, पोहेकॉ रवींद्र पवार, पोहेकॉ सचिन चव्हाण, पोशि ज्ञानेश्वर सूर्यवंशी आणि पोशि गणेश पाटील यांनी शिबिराच्या आयोजनात महत्त्वपूर्ण योगदान दिले.शिबिराच्या यशस्वी आयोजनाबद्दल जिल्हा रक्त संक्रमण अधिकारी डॉ. रमा वाडेकर तसेच इतर वैद्यकीय अधिकाऱ्यांनी नंदुरबार जिल्हा पोलिस दलाचे आभार मानले.

## एनसीसी कॅडेटसची पोलीस दलात निवड

शहादा, दि.७ (प्रतिनिधी)- देशसेवेची भावना मनात बाळगून, समाजाची सेवा करण्यासाठी सदैव तत्पर असणाऱ्या शहादा येथील पूज्य साने गुरुजी प्रसारक मंडळाचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या तीन एन.सी.सी. कॅडेट्सनी आपले पोलीस बनण्याचे स्वप्न प्रत्यक्षात आणले आहे. या महाविद्यालयातील तीन कॅडेट्सची पोलीस दलामध्ये यशस्वी निवड झाली आहे.

कॅडेट बादल भिल, हितेश सोनवणे आणि लक्ष्मण पाटील अशी पोलीस दलात निवड झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांची नावे आहेत. पोलीस बनण्याचे ध्येय साध्य करण्यासाठी या कॅडेट्सनी रात्रंदिवस अभ्यास केला, तसेच मैदानी चाचणीसाठी (ग्राउंड प्रॅक्टिस) प्रचंड मेहनत घेतली होती. त्यांच्या याच अथांग परिश्रमामुळे त्यांना हे यश संपादन करता आले.

या दैदिप्यमान यशाबद्दल महाविद्यालयात एका विशेष सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी मंडळाचे समन्वयक प्रा.मकरंद पाटील यांच्या हस्ते यशस्वी कॅडेट्सचा पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला तसेच त्यांच्या पुढील उज्ज्वल वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या.

या कॅडेट्सना पोलीस भरती प्रक्रिये संदर्भात वेळोवेळी मोलाचे व अचूक मार्गदर्शन एन.सी.सी. विभागाचे कॅप्टन सुभाष भालेराव यांनी केले. ते देखील या सत्कार समारंभास प्रामुख्याने उपस्थित होते. याशिवाय महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. के. पटेल यांनीही या कार्यक्रमाला उपस्थित राहून विद्यार्थ्यांचे कौतुक केले. कॅडेट्सच्या या यशाबद्दल पूज्य साने गुरुजी प्रसारक मंडळाचे अध्यक्ष दीपकभाई पाटील आणि उपाध्यक्ष जगदीश पाटील यांनी यशस्वी कॅडेट्ससह एन.सी.सी. विभागाचे विशेष कौतुक करून सर्वांना शुभेच्छा दिल्या आहेत. या यशामुळे महाविद्यालय आणि परिसरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे

## साईबाबा नगरात हरिनाम सप्ताह

शहादा,दि.०७ (का.प्र.)- श्री संत शिरोमणी सेना महाराज पुण्यतिथीनिमित्त साईबाबा नगर येथील श्री गोकर्णेश्वर महादेव मंदिर प्रांगणात आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाच्या चौथ्या दिवशी युवा कीर्तनकार ह. भ. प. मुक्ताताई आयणेकर यांचे कीर्तन पार पडले.

संत तुकाराम महाराजांच्या कन्या सासुयासि जाये... या अभंगावर निरूपण करत त्यांनी भक्त आणि परमेश्वराच्या विरहभावाचे भावस्पर्शी वर्णन केले.कीर्तनातून त्यांनी माहेर, कुटुंबव्यवस्था, नातेसंबंध आणि संस्कारांचे महत्त्व पटवून दिले. तसेच संत मुक्ताबाई, जनाबाई, मीराबाई, राजमाता जिजाऊ आणि सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा गौरव करत स्त्रीशक्तीचा जागर मांडला. आमदार राजेशदादा पाडवी, भाजप नंदुरबार जिल्हा उपाध्यक्ष मकरंद पाटील आणि तहसीलदार संभाजी पाटील या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. यजमान हेमराज पवार व नगरसेविका ममता पवार यांनी उपस्थितांचे स्वागत केले, तर सूत्रसंचालन प्रा. डॉ. अनिल साळुंके यांनी केले.सोशल मीडियाद्वारे महाराष्ट्र, गुजरात, मध्य प्रदेश आणि राजस्थानमधील हजारो भाविकांनी थेट प्रक्षेपणाचा लाभ घेतला. महाआरती आणि प्रसाद वितरणाने कार्यक्रमाची सांगता झाली.

✻ धुळे, दि.७- शहरात मोकाट जनावरे व कुत्र्यांच्या समस्येमुळे नागरिक हैराण झाले आहेत. रस्त्याच्या मध्यभागी कुत्रे तसेच मोकाट जनावरांच्या झुंडी बसलेल्या असल्याने वाहनधारकांना तारेवरची कसरत करत मार्ग काढावा लागतो. महानगरपालिकेने मोकाट जनावरांसह कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.





प्रकाश में आज जिगर




अजय देवगज करिश्मा कपूर गुलशनग्रोवर अजित अर्जुन


### शब्दकोडे क्रमांक : २४४८



**आडवे शब्द :** १.यशस्वी झालेले कार्य ३.दोन प्रतिस्पर्ध्यांमधील लढत किंवा खेळ ६.तमाशात सादर होणारे नाट्य ८.फळ, बी किंवा अंड्याचे बाहेरील कडक कवच १०.बॉलिवूडचे प्रसिद्ध दिवंगत अभिनेते आणि संवाद लेखक १२.घराचा मुख्य प्रवेशमार्ग किंवा दरवाजा १३. 'चिंच' या आंबट फळाला हिंदीत काय म्हणतात नसरुद्दीन शाह,पूजा भट,विवेक अग्निहोत्री यांचा एक हिंदी सिनेमा १६.हरीण किंवा गुरांचा एकत्र फिरणारा समूह १८.दारू किंवा पेये मिळण्याचे ठिकाण २०.आजच्या आधीचा निघून गेलेला दिवस २१.छत २२. दमट हवेमुळे अन्नावर येणार पांढरा किंवा काळा थर किंवा त्यासारखा २५.प्रवासातील एक टप्पा किंवा गाठलेले अंतर २७. शेताला पाणी देण्याचा छोटा प्रवाह किंवा बसण्यासाठी लाकडी आसन २८.पोळ्या किंवा भाकऱ्या भाजण्यासाठी वापरले जाणारे लोखंडी भांडे २९.डोंगराचा सरळ आणि खोल कडेचा भाग ३०.गरजू लोकांना व्याजाने पैसे देणारा जुन्या काळातील धनिक ३२.मोठा, नामांकित किंवा श्रीमंत व्यक्ती ३५.तांदूळ किंवा भाजणीपासून बनवला जाणारा दिवाळीचा काटेरी वर्तुळाकार फराळ ३६.हो-इंग्रजीत ३७.माग काढणे किंवा गुप्तपणे नजर ठेवणे ३८.माणसांची विविध सामाजिक वर्गात केलेली विभागणी ३९.१८५७ च्या रणसंग्रामातील थोर स्वातंत्र्य सेनानी 'तात्या ** ' ४०.नवजात बाळाला पाळण्यात टाकून नाव ठेवण्याचा सोहळा ४२.शर्टच्या कॉलरला बांधली जाणारी गळपट्टी ४४.ओसाड ४५.महापूर किंवा निसर्गाचा विनाशकारी कोप ४६.कारागृहातील शिक्षा किंवा जेलमधील कैद ४८.राजाज्ञा, हुकूम किंवा एखादा अधिकृत आदेश ४९.नाटकाची सुरुवात किंवा एखाद्या चांगल्या गोष्टीची सुरुवात ५०. मंगळ कार्यात चौघड्यासोबत वाजवले जाणारे मुख्य वाद्य **उभे शब्द :** १.सैन्याचा मुख्य अधिकारी किंवा जुन्या काळातील जहागीरदार २.डोक्याच्या केसांची एक बटा किंवा बट ३.स्वच्छ ४.दुधावरील मलई ५.डायरीत किंवा पुस्तकात लिहून घेतलेली माहिती ६.लाकडे किंवा धान्य साठवून ठेवण्याचे मोठे गोदाम ७.इंग्रजीत 'बंदुकी'ला काय म्हणतात ९.खरखरीत ११.पूर्णपणे रसाने भरलेले किंवा १४. बुद्धी १६.झाडाची फांदी लावून केलेले नवीन झाड,लेखणी १७.डोळ्याचा किंवा पडद्याचा एक थर १८.फटाका १९. दुसरा किंवा वेगळा २२.खुजा २३.पोलिसांसमोर किंवा कोर्टात दिलेली लेखी साक्ष २४.अतिशय फिका किंवा रंगाची हलकी छटा २६.सामान्य लोक किंवा जनता ३०.लहान पूल ३१.छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील प्रजा किंवा जनता ३३.खेळात किंवा राजकारणात शत्रूला हरवण्यासाठी आखलेली रणनीती ३४.लाकूड जळल्यानंतर तयार होणारा काळा पदार्थ ३७.स्पर्श केल्यावर लोखंडाचे सोने करणारा एक काल्पनिक दगड ४१. पाणी वाहून नेण्यासाठी मानवनिर्मित केलेला छोटा प्रवाह ४३.कामानिमित्त वा फिरण्यास जाताना होणारी पायपीट ४५.एखाद्या पुस्तकाची हुबेहूब नक्कल ४७.इंग्रजीत-सूर्य

### शब्दकोडे क्रमांक : २४४७ चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| स | र | का | र | | दा | व | | मे | घा | ल | य |
| ज | व | | म | म | ता | | स | रा | व | | म |
| ग | | क | मा | न | | वा | र | सा | | फ | न |
| | तो | र | ण | | दा | द | | या | रा | ना | |
| मे | | म | | ची | न | | अ | | न | | था |
| वा | ढ | | खा | ज | | अ | जिं | क्य | | ऐ | ट |
| ड | | ना | रा | | गो | | क्य | | प | त | |
| | वं | श | | य | | प्र | ता | प | | वा | घ |
| सा | ग | | का | ल | वा | | रा | | ता | र | |
| ग | ण | ती | | गा | र | वा | | गो | ठा | | सा |
| वा | | न | ज | र | | च | प | ळा | | वा | व |
| न | भ | | ल | | स | क | ल | | बे | री | ज |

## पान १ वरुन

## एक पुरावा दिला तर क्षणभर पदावर राहणार नाही

उतरून आक्रोश मोर्चा काढला. सोमवारी सकाळी १० वाजता ऐतिहासिक ओंकारेश्वर मंदिरापासून मोर्चाला सुरुवात झाली. त्यानंतर मोर्चा पुणे जिल्हाधिकारी कार्यालयावर नेण्यात आला. मार्च २०२६ मध्ये झालेल्या औषध निरीक्षक गट-ब परीक्षेच्या पेपरफुटीचे प्रकरण समोर आल्यानंतर ऑगस्ट २०२६ मध्ये ही परीक्षा रद्द करण्यात आली होती. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांनी एम.पी.एस.सी.चे अध्यक्ष आणि सचिव यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा, अशी मागणी केली.

**विरोधकांचाही आंदोलनाला पाठिंबा**

विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून पाठिंबा देण्यात आला. खासदार सुप्रिया सुळे, आमदार रोहित पवार आणि आमदार विश्वजीत कदम हे मोर्चात सहभागी झाले. आदित्य ठाकरे आणि अभिजीत दिपके यांनीही आंदोलनाला पाठिंबा दर्शवला. यावेळी आमदार रोहित पवार यांनी एम.पी.एस.सी.च्या परीक्षांमध्ये गैरप्रकार होत असल्याचा आरोप करत विद्यार्थ्यांचे भविष्य ठरवणाऱ्या महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षांमध्येच भ्रष्टाचार होत असेल तर प्रश्न विचारायचे नाहीत का? यात कुठले राजकारण आले? असा प्रश्न केला.

## एमपीएससी विरोधात पुण्यात आक्रोश मोर्चा

अभ्यासिकेत अभ्यास करण्याऐवजी रस्त्यावर आंदोलन करण्यात जात आहे. हे सरकारचे मोठे अपयश आहे, असा आरोप सुप्रिया सुळे यांनी केला. पेपरफुटीवरून सरकारला प्रश्न करताना सुप्रिया सुळे यांनी आंतरराष्ट्रीय परीक्षांचा दाखला दिला. देशात टीईटी आणि जीआरई सारख्या परीक्षा घेतल्या जातात. मात्र तिथे पेपरफुटीच्या घटना होत नाहीत, असे त्या म्हणाल्या. आज ए.आय़. तंत्रज्ञान उपलब्ध असतानाही पेपरफुटी थांबत नसेल, यावर माझा विश्वास बसत नाही, असे म्हणत त्यांनी परीक्षा व्यवस्थेतील त्रुटींवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. विद्यार्थ्यांशी चर्चा करा, हट्टीपणा सोडा राज्य आणि देशातील आर्थिक परिस्थितीवरून लक्ष विचलित करण्यासाठी सरकारकडून दोन धर्मांमध्ये भांडणे लावली जात असल्याचा आरोपही सुप्रिया सुळे यांनी केला. सरकारने हट्टीपणा सोडून जबाबदार व्यक्तीला विद्यार्थ्यांशी चर्चा करण्यासाठी पाठवावे, अशी मागणीही त्यांनी केली. विद्यार्थ्यांचा असंतोष वाढत राहिल्यास आंदोलनाला मोठे स्वरूप येऊ शकते, असा इशारा देत जंतर-मंतरसारखा उद्रेक टाळण्यासाठी सरकारने वेळीच संवाद साधावा, असे आवाहन सुळे यांनी केले. एमपीएससीच्या परीक्षा, निकाल प्रक्रिया आणि परीक्षा व्यवस्थेतील पारदर्शकतेबाबत विद्यार्थ्यांमध्ये असलेला असंतोष या मोर्चाच्या माध्यमातून पुन्हा एकदा समोर आला आहे.

## धनगर आरक्षण अंमलबजावणीसह विविध

कायदा करून विश्वस्त मंडळामध्ये किमान विश्वस्त असावेत आणि त्यामध्ये धनगर समाजातील व्यक्तींना प्रतिनिधित्व देण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. याशिवाय मुंबई-पुणे एक्स्प्रेसवेवरील मिसिंग लिंकला शिंग्रोबा धनगर यांचे नाव देण्यात यावे, मुंबईतील चर्चगेट रेल्वे स्थानकाला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव देण्यात यावे, मेंढपाळांच्या चराई क्षेत्रावर झालेले अतिक्रमण काढण्यात यावे तसेच मेंढपाळांवर दाखल झालेले खोटे गुन्हे तात्काळ मागे घेण्यात यावेत, अशा विविध मागण्या करण्यात आल्या आहेत.धनगर समाजाच्या न्याय्य हक्कांसाठी शासनाने या मागण्यांवर तातडीने सकारात्मक निर्णय घेऊन न्याय मिळवून द्यावा, अशी विनंती निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

राज्यव्यापी आक्रोश आंदोलनाचे आयोजक आमदार गोपीचंदजी पडळकर भाजप प्रदेश उपाध्यक्ष,यांच्या नेतृत्वाखाली राज्यभर हे आंदोलन करण्यात येत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. मागण्या तात्काळ मान्य कराव्यात अन्यथा राष्ट्रीय महामार्ग अडवून तीव्र आंदोलन करण्याचा इशारा धनगर समाज संघर्ष समितीचे जिल्हा अध्यक्ष रमेश सरक व जिल्हा सरचिटणीस शैलेंद्र आजगे यांच्या नेतृत्वात साक्रीचे तहसीलदार साहेबराव सोनवणे यांना देण्यात आला. यावेळी धनगर, ठेलारी व हटकर समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सोंडले येथे बिबट्याची दहशत वाढली

संपूर्ण परिसरात तीव्र घबराट पसरली आहे. सोंडले फिडर परिसर आणि शेतशिवारात बिबट्याचा वावर वाढल्याने रात्रीच्या वेळी शेतात जाणे, कृषी पंप सुरू करणे आणि पिकांना पाणी देणे शेतकऱ्यांसह शेतमजुरांसाठी जीवघेणे ठरत आहे.शेतकऱ्यांच्या जीवितास असणारा हा गंभीर धोका विचारात घेऊन महावितरणने सोंडले फिडरवरील रात्रीची वीजपुरवठ्याची पाळी तात्काळ रद्द करावी आणि दिवसा वीजपुरवठा उपलब्ध करून द्यावा, अशी आग्रही मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. या घटनेची गांभीर्याने दखल घेऊन प्रशासनाने तातडीने निर्णय न घेतल्यास शेतकऱ्यांचा जीव टांगणीला राहील, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

## कर्जमाफी यादीतून शेतकऱ्यांची नावे वगळली

मोठ्या प्रमाणात मोर्चा काढण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला.

**ई-पिक पाहणी शेतकरी स्तरावरून सुरू करण्याची मागणी**

सन २०२६-२७ खरीप हंगामातील ई-पिक पाहणी सध्या ओसीएच एमएस ॲपवर ई-पिक पाहणी सहाय्यकांमार्फत सुरू आहे. मात्र शेतकरी स्तरावरील ई-पिक पाहणी बंद असल्याने शेतकऱ्यांना स्वतः पिकांची नोंदणी करता येत नाही. ई-पिक पाहणी सहाय्यक वेळेवर उपलब्ध होत नसल्याने शेतकऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे ई-पिक पाहणीची सुविधा शेतकरी स्तरावरून पुन्हा सुरू करावी, अशी मागणी करण्यात आली.

यावेळी महाराष्ट्र प्रदेश आदिवासी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष आर. सी. गावीत, लालू गावीत, रमेश गावीत, शमुवेल गावीत, अनिल गावीत, गेशु गावीत, संजय मावची, धिरज गावीत, लक्ष्मण गावीत, राहुल गावीत, दिवाजी गावीत व आयुब गावीत आदी शेतकरी उपस्थित होते.

## अध्यक्षपदी प्रदिप जाधव, सचिवपदी

म्हणून सर्वश्री रोहिदास हाके, तव्वाब अन्सारी, दत्ता बागुल, जितेंद्र खैरनार, विजय पाठक, रविंद्र शिंदे, प्रमोद झाल्टे,जॉनीभाई पवार, रेखपचंद लोढा, जितेंद्रसिंग राजपूत, दिनेश विभांडीक यांची कार्यकारिणी सदस्य म्हणून बिनविरोध निवड झाली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून रमेश दाणे यांनी काम पाहिले.

या बैठकीला आशुतोष जोशी, डी बी पाटील, ईश्वर बडगुजर, हेमंत मदाने, मॅन्युअल मकासारे, भरत काळे, डॉ. सुरेश कासार, अब्दुल वाहिद कक्कर, सुनील बाहाळकर, अ रहमान मलिक, शे. जहागीर, अन्सारी सफ्यु रहमान, शहाबुद्दीन शेख, विकास कपोले, ईश्वर राजपूत, ललित चव्हाण, आनंद कुलकर्णी, संजय मोरे, प्रशांत पाकळे, तुषार सावंत, अनिल वाघ, संदिप फुलपगारे, जितेंद्र गिरासे, केशव पाटील, जगन्नू अन्सारी, सिद्धार्थ मोरे, अजम शेख, जितेंद्र खैरनार, रविंद्र बडगुजर, भरतसिंग राजपूत आदी मान्यवर मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती.

सदर बैठक अत्यंत खेळमेळीच्या वातावरणात पार पडली. निवडणूक निर्णय अधिकारी रमेश दाणे यांनी सन २०२६ ते २०२८ या दोन वर्षांसाठीच्या सर्व पदाधिकाऱ्यांची व कार्यकारी सदस्यांची निवड बिनविरोध झाल्याची अधिकृत घोषणा केली व सर्वांचा सत्कार केला. शेवटी पत्रकार संघाचे माझी सचिव डी.बी. पाटील यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले व बैठकीची समाप्ती केली.

## वरखेडेत वीज समस्या मार्गी आ.राम भदाणेंची सुचना

उपलब्ध करून देण्यात आला व बसविण्यात आला. नवीन ट्रान्सफॉर्मर बसल्याने शेतशिवारातील वीज पुरवठा सुरळीत झाला आहे. हा प्रश्न केवळ एका कॉलवर निकाली निघाल्याने शेतकरी व ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

## पान १ वरुन

## सावळदे गावात शिपायाला मारहाण

हवालदार प्रमोद ईशी तपास करीत आहेत. याच प्रकरणात, जितेंद्र सुकलाल कोळी (वय ४२) याने दिलेल्या फिर्यादीवरुन विनोद रतन सोनवणे याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून हवालदार दुसाणे तपास करीत आहेत.

## हा.ज़मीर अ.मुल्ला सर फाऊंडेशन धुळे

तसेच संस्थेच्या उद्दिष्टांसोबत काम करण्याची इच्छा व्यक्त केली. हाफिज फहद इक्बाल यांच्याहस्ते अन्सार हॉल आणि जमीर अहमद मुल्ला सर फाऊंडेशनच्या फलकाचे उद्घाटन करण्यात आले. हुजैफा बरकतुल्ला यांनी कुराण आणि हदीसच्या प्रकाशात ज्ञानाविषयी एक शास्त्रीय विवेचन केले आणि त्यावर कृती करण्याचे आवाहन केले. याच समारंभाचा तिसरा भाग म्हणून शनिवार, १५ ऑगस्ट २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेला देशभक्ती वर फलक लेखन स्पर्धेचे निकाल जाहीर करण्यात आला. स्पर्धेत प्रथम पारितोषिक नॅशनल उर्दू हायस्कूलचे शिक्षक खालिद अब्दुल आहद, द्वितीय पारितोषिक अलहेरा उर्दू प्राथमिक शाळेचे शिक्षक साजिद मोहम्मद युनूस आणि तृतीय पारितोषिक महानगर पालिका उर्दू शाळा क्र.५३चे कार्यरत शिक्षक मुदस्सर मुख्तार शेख यांना प्रदान करण्यात आले. याप्रसंगी हाजी मोहम्मद अफ्फान अन्सारी, इस्माईल राज़, सलीम अन्सारी, शब्बीर शाकिर, हाफिज फहद इक्बाल आसिफ इक्बाल आणि हुजैफा बरकतुल्ला हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. इस्माईल शाद यांनी सूत्रसंचालन केले.

## सबमर्सिबल केबल मोटारींची चोरी

मागील महिन्यात २५ व २६ ऑगस्टच्या रात्री अज्ञात चोरट्यांनी वायर चोरी केल्यानंतर शेतकऱ्यांनी नवीन वायर टाकून मोटारी सुरू केल्या होत्या. मात्र, त्यानंतर पुन्हा ५ व ६ सप्टेंबरच्या रात्री अज्ञात चोरट्यांनी शेतातील वायर चोरी केल्याचे तक्रारीत म्हटले आहे. त्यामुळे महिनाभरात दोन ते तीन वेळा चोरीच्या घटना घडल्याने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

तक्रारीनुसार, शेतातील विद्युत मोटारींसाठी वापरण्यात आलेल्या अंदाजे १ लाख ६० हजार रुपये किमतीच्या तांब्याच्या वायर चोरीला गेल्या आहेत. तसेच लोंढे येथील सौ. सुनीता सुधाकर कोळी यांच्या मालकीची अंदाजे ५० हजार रुपये किमतीची सबमर्सिबल पाण्याची मोटार देखील ५ व ६ सप्टेंबरच्या रात्री अज्ञात इसमांनी चोरून नेल्याचे तक्रारीत नमूद आहे.

या घटनांमुळे शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसण्याबरोबरच शेतीसाठी पाण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे चोरीच्या घटनांचा तपास करून चोरट्यांचा शोध घेऊन त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करावा व कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी विनोद देवीदास भामरे यांच्यासह शेतकऱ्यांनी पोलिसांकडे केली आहे. तक्रारीच्या प्रती उपविभागीय पोलिस अधिकारी, शिरपूर तसेच पोलिस अधीक्षक, धुळे यांनाही देण्यात आल्या आहेत.

## शहाद्यात दोन कोटींच्या विकासकामांचे

करण्यात आला. पेवर ब्लॉक बसवल्यामुळे दादावाडी परिसर स्वच्छ, सुबक व आकर्षक दिसणार असून दर्शनासाठी येणाऱ्या सकल जैन समाज बांधवांसाठी प्रसन्न वातावरण निर्माण होणार आहे.या प्रसंगी भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते डॉ. कांतीलाल टाटिया, भाजप जिल्हा उपाध्यक्ष तथा प्राचार्य मकरंद पाटील, शहादा नगरपालिकेच्या उपनगराध्यक्ष माधवी पाटील, श्री महावीर नागरी सहकारी पतसंस्थेचे संस्थापक चेअरमन रमेश चोरडिया, व्हा.चेअरमन विनयचंद्र गांधी, पारस जैन, समतीलाल जैन, कचरूलाल नहाटा, प्रदीप नहाटा, नगरसेवक ज्ञानेश्वर चौधरी, बांधकाम सभापती संतोष वाल्हे, पाणीपुरवठा सभापती प्रदीप ठाकरे, नगरसेवक ललित छाजेड, सागर मराठे, महावीर पतसंस्थेचे चेअरमन समीर जैन, मोतीलाल जैन, भरत ओसवाल, दिलीप जैन, विनोद जैन यांच्यासह शहरातील राजकीय-सामाजिक कार्यकर्ते व सकल जैन समाजातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना आ.पाडवी म्हणाले की, राज्य शासनाच्या अल्पसंख्यांक विभागाकडून धार्मिक व सामाजिक कामांसाठी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून दिला जात आहे. शहादा-तळोदा मतदार संघात जास्तीत जास्त निधी आणून विकासकामांना गती देण्याला आमचे प्राधान्य आहे. अल्पसंख्यांक विभागाच्या दीड ते दोन कोटी रुपयांच्या निधीतून दादावाडी परिसरात पेवर ब्लॉक व नवीन वसाहतींमधील रस्त्यांच्या कामाला सुरुवात झाली असून, यामुळे शहरातील धार्मिक व सामाजिक स्थळांचा कायापालट होण्यास मदत होईल.

## पान १ वरुन

## मनपाचे मुलींच्या सुरक्षित आरोग्यासाठी

एचपीव्ही लसीकरण महत्त्वपूर्ण प्रतिबंधात्मक उपाय मानला जातो. त्यामुळे योग्य वयात मुलींना लसीकरण उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने शासनामार्फत ही विशेष मोहीम राबविण्यात येत आहे.

धुळे महानगरपालिकेच्या नंदीरोड, प्रभातनगर, हजार खाली, राऊळवाडी आणि कृष्णनगर येथील पाच दवाखान्यांमध्ये हे लसीकरण करण्यात येत आहे. लसीकरणाबाबत पालक व विद्यार्थिनींमध्ये असलेल्या अनाठायी भीतीचे निरसन करण्याचे आवाहनही मनपामार्फत करण्यात आले आहे. आतापर्यंत लसीकरण झालेल्या विद्यार्थिनींमध्ये कोणताही गंभीर दुष्परिणाम आढळून आलेला नसल्याचे महानगरपालिकेने स्पष्ट केले आहे.

मुलींच्या निरोगी आणि सुरक्षित भविष्यासाठी एचपीव्ही लसीकरण अत्यंत महत्त्वाचे असून, पात्र वयोगटातील सर्व मुलींनी आपल्या पालकांच्या सहकार्याने लसीकरण करून घ्यावे, असे आवाहन धुळे महानगरपालिकेतर्फे करण्यात आले आहे.

# शिरपूर तालुका दुष्काळी जाहीर करावा- प्रा.पी.एस.अंतुर्लीकर

**शिरपूर दि.७ (का.प्र.) : गेल्या दीड महिन्यापासून शिरपूर तालुक्यात पावसाने दडी मारल्याने पिकांची स्थिती गंभीर झाली असून, अपुऱ्या पावसासोबतच नियमित वीजपुरवठा होत नसल्याने शेतकऱ्यांवर दुहेरी संकट ओढवले आहे. त्यामुळे शिरपूर तालुका दुष्काळी जाहीर करावा, अशी मागणी अंतुर्ली येथील प्रगतिशील शेतकरी तथा शिरपूर पंचायत समितीचे माजी उपसभापती प्रा. पी. एस. अंतुर्लीकर यांनी केली आहे.**



तालुक्यात केळी, पपई, ऊस, कापूस, मका यांसह मूग, बाजरी व तूर ही प्रमुख पिके घेतली जातात. मात्र, गेल्या एक ते दीड महिन्यात केवळ तुरळक सरी झाल्याने जमिनीची तहान भागलेली नाही. परिणामी पिकांची वाढ खुंटली असून पिके शेतकऱ्यांच्या डोळ्यादेखत करपू लागली आहेत. नदी-नाले कोरडे पडले असून विहिरी व बोअरवेलच्या पाणीपातळीतही मोठी घट झाली आहे. गवत सुकल्याने पशुधनासाठी चाऱ्याचा प्रश्न निर्माण झाला असून दूध उत्पादक शेतकरीही अडचणीत सापडले आहेत.

दुसरीकडे, शेतकऱ्यांना मिळणाऱ्या आठ तासांच्या वीजपुरवठ्यातही वारंवार खंड पडत असल्याने परिस्थिती अधिक गंभीर झाली आहे. विशेषतः पश्चिम शिरपूर परिसरात वरुळ सबस्टेशन अंतर्गत वीजपुरवठा वारंवार खंडित होत असल्याच्या तक्रारी शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहेत. पाच-पाच मिनिटांनी वीज ट्रिप होत असल्याने विहीर व बोअरवेलचे पाणी पिकांना देता येत नसल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. वीजपुरवठा सुरळीत न झाल्यास वरुळ सबस्टेशनवर मोर्चा काढण्याचा विचार शेतकरी करीत असून, भविष्यात शेतकरी व वीज मंडळाच्या अधिकाऱ्यांमध्ये संघर्ष निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांवर राहील, असा इशारा प्रा.अंतुर्लीकर यांनी दिला आहे.

## निधन वार्ता

### मालती महाजन



धुळे, दि.७- देवपूर नकाणे रोड प्रमोद नगर से.नं.३ प्लॉट नं.५६ येथील रहिवासी मालतीबाई चंद्रकांत महाजन यांचे दीर्घ आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ७५ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, एक मुलगी, सुन, नातवंडे, जावई असा परिवार आहे. त्या सार्वजनिक बांधकाम विभागातील इंजि.हेमंत महाजन व सॉफ्टवेअर इंजि.जितेंद्र महाजन यांच्या मातोश्री होत.

## पान १ वरुन

## गणपती उत्सव मंडपाच्रा भूमीपूजन सोहळा संपन्न

आकाश कांतीलाल वाघ कार्याध्यक्ष रोहित राजेंद्र चौधरी स्वागत अध्यक्ष भगवान मांगीलाल चौधरी खजिनदार भूषण पितांबर चौधरी सचिव लोकेश चौधरी सहसचिव मयूर माळी राहुल हडप मयूर चौधरी किशोर हरि चौधरी बोलू चौधरी किरण चौधरी कल्पेश चौधरी चेतन चौधरी सोनू चौधरी निलेश चौधरी आकाश चौधरी यांच्यासह असंख्य कार्यकर्ते भूमिपूजन समारंभासाठी उपस्थित होते यावेळी देखील मंडळाच्या वतीने सजीव देखावा सादर होणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

## धुळे जि. हमाल कामगार संघटनेचा मागण्यासाठी

देण्यात यावा. ई-टेंडर प्रणालीत कामगारांचे रक्षण व्हावे: ई-टेंडर भरताना माथाडी कामगारांची मजुरी आणि लेव्हीची व्यवस्था ठेकेदारांनी करणे अनिवार्य करावे.

मागण्यांची लवकरात लवकर पूर्तता न झाल्यास हमाल कामगार आक्रमक पवित्र्यात उतरतील आणि १८ सप्टेंबरपासून तीव्र आंदोलन छेडतील, असा इशारा धुळे जिल्हा हमाल कामगार संघटनेचे अध्यक्ष गंगाधर कोळकर, जनरल सेक्रेटरी भागवत चितळकर, कार्याध्यक्ष हेमंत मदने, संतोष सोनवणे, देविदास जाधव,जगदीश भिल, नामदेव कुलपगारे यांच्यासह सर्व पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.

## कोरोना काळापासून बंद असलेली

यश मिळून नवापूर आगाराने ही बससेवा पुन्हा सुरू केली आहे.

यावेळी बोलताना भरत गावीत म्हणाले की, देवमोगरा येथे आदिवासी समाजाची कुलदेवता असलेल्या देवमोगरा मातेचे मंदिर आहे. बससेवा बंद असल्यामुळे भाविकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. सातत्याने पाठपुरावा केल्यानंतर आगार प्रमुख सौरभ रत्नपारखी यांनी बससेवा सुरू केली, त्याबद्दल त्यांचे आदिवासी समाजाच्या वतीने अभिनंदन. तसेच नवापूर तालुक्यातील शाळा व महाविद्यालयात जाणाऱ्या विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठीही वेळेवर बससेवा सुरू करण्यासाठी प्रयत्न करणार आहे, असे त्यांनी सांगितले.

आगार प्रमुख सौरभ रत्नपारखी म्हणाले की, भरत गावीत यांनी नवापूर-देवमोगरा बससेवा सुरू करण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केल्यामुळे ही बससेवा पुन्हा सुरू करण्यात आली आहे. भाविक, विद्यार्थी व नागरिकांनी या बससेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. तसेच वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना अमृत ज्येष्ठ नागरिक योजनेअंतर्गत मोफत प्रवासाची सुविधा उपलब्ध असल्याची माहितीही त्यांनी दिली.

**असे राहणार बसचे वेळापत्रक**

नवापूर बसस्थानकातून दररोज दुपारी २ वाजता बस देवमोगराकडे रवाना होईल. ही बस बाबरघाट, केसरपाडा चौफुली, वेलदाटाकी, कुकुरमुंडा, अक्कलकुवा, सेलंबा, साकबारा मार्गे सायंकाळी ६.३० वाजता देवमोगरा येथे पोहोचणार आहे. देवमोगरा येथे बस मुक्कामी राहणार असून सकाळी ६ वाजता देवमोगरा येथून नवापूरकडे रवाना होणार आहे.

बससेवा पुन्हा सुरू झाल्याने देवमोगरा मातेच्या दर्शनासाठी जाणारे भाविक, विद्यार्थी, महिला व नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण असून भरत गावीत यांच्या पाठपुराव्याचे नागरिकांकडून स्वागत होत आहे.


||अभिष्टचिंतन||
७ सप्टेंबर
मा.श्री.निलेश तुकाराम सुर्यवंशी
सदस्य,
विश्वकर्मा फाऊंडेशन,धुळे
आपणास वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा!

शुभेच्छुक
श्री.दिनेश शार्दूल मा. नगरसेवक, मनपा, धुळे
श्री.दिपक शेलार मा. नगरसेवक, मनपा, धुळे
श्री.पंडीत मिस्तरी कार्याध्यक्ष श्री विश्वकर्मा फाउं.
श्री.दिंगबर मिस्तरी सेक्रेटरी, सु.स. सेवा मंडळ
इंजि.दिपक आहिरे मा.अध्यक्ष, बिल्डर असो, धुळे
इंजि.दिनेश कुवर उपाध्यक्ष श्री विश्वकर्मा फाउं.
इंजि.विलास मोरे से.नि.उप कार्य अभियंता
श्री.राजेंद्र मोरे से.नि. सहा पो. उपनिरीक्षक
डॉ.नितीन कापडीस सचिव, श्री विश्वकर्मा फाउं.
श्री.विजय शेलार खजिनदार, सु.स. सेवा मंडळ
श्री.सतिष खैरनार सदस्य, श्री विश्वकर्मा फाउं.
श्री.मधुकर हिरे सदस्य, बिल्डर असो, धुळे
शुभेच्छुक - मैत्री ग्रुप व प्रभु विश्वकर्मा समाज समन्वय समिती, धुळे.



धुळ्यात 'प्लास्टो' आणी इतर सर्व नामांकित कंपनीच्या पाण्याच्या टाक्या आमच्याकडे होलसेल रेटमध्ये उपलब्ध आहेत..


१०० ते १०,००० लिटर पर्यंत गोल व चौरस टाक्या होलसेल रेट व हजर स्टॉक मध्ये उपलब्ध आहे.
धुळ्यात प्लास्टो कंपनीच्या टाक्या मिळण्याचे एकमेव ठिकाण...
शंकर विजय सॉ मिल
प्रकाश टॉकीज समोर, पारोळा रोड, धुळे.
फो. 9422285091



गणपती बाप्पा मोरया
बाप्पाच्या आवडीचे
मोदक
फक्त मदर्स किचनमध्येच
१) उकडीचे मोदक
२) ओल्या नारळाचे तळणीचे मोदक
३) गौरी फराळ (अनारसे, करंजी, चकली, चिरोटे). नोंदणी आवश्यक
मदर्स किचन
फुलवाला चौक धुळे.
9049902201
7887750864



पाहिजेत
१) प्रिटींग मशिन हेल्पर
२) ग्राफिक डिझायनर
सुयोग डिजीटल प्रिंटर्स
श्रीराम कॉम्प्लेक्स, पॉवर हाऊसजवळ, साक्रीरोड, धुळे.
मो.8087524209



पाहिजेत
लेखी अकाउन्ट लिहिणारा जेष्ट जेण्टस लावणे आहे.
कापड दुकानात काम करणेसाठी लेडीज/जेण्टस पाहिजेत.
-: संपर्क :-
मो.9423941247



पाहिजेत
आयुर्वेद हॉस्पिटलमध्ये कर्मचारी पाहिजेत.
साफसफाईसाठी :- २ स्त्री, २ पुरुष
कम्पाउंडर आणि पंचकर्मासाठी:- २ पुरुष, ३ स्त्री
पत्ता : डॉ.जगताप यांचे लताकुसुम हॉस्पिटल,
गल्ली नं. ६, भांग्या मारुती चौकाजवळ, जयप्रकाश चौक, धुळे
फोन 9422269550



पाहिजेत
रेडिमेड कपड्यांच्या दुकानासाठी
Sales man / Sales Girl
त्वरित पाहिजे.
आकर्षक पगार देण्यात येईल
-:संपर्क :-
गौतम जैन
पाच कंदिल, आग्रारोड, धुळे
8208392178



पाहिजेत
दुकान कामासाठी सेल्समन व हेल्पर लावणे आहे.
जेन्टस व लेडीज
-: समक्ष भेटा :-
शाह हॅन्डलुम
नवग्रही गल्ली नं. २, पारोळा रोड, धुळे



पाहिजेत
कापड दुकानासाठी खालील जागा भरणे आहेत.
सेल्समन : २
हेल्पर : २
समक्ष येवून भेटा.
बेबीज वर्ल्ड
ग. नं. २, धुळे
त्रिविक्रम मंगल कार्यालय समोर, धुळे
9850835999



पाहिजेत
होलसेल मेडिकलमध्ये कामासाठी मुले पाहिजेत
१) सेल्समन आणि कलेक्शन्स बाहेर गावी
२) दुकान काम हेल्पर
अनुभव असल्यास प्राधान्य
-:संपर्क :-
8888096777



५९ वर्षापासुन धुळेकरांच्या विश्वासाला पात्र ठरलेले...
Authorised Dealer
godrej
LG Life's Good
JAPAN PREMIUM
सर्व आधुनिक व लेटेस्ट मॉडेल

0% फायनान्सची सुलभ E.M.I सुविधा उपलब्ध.
*नियम व अटी लागू
BAJAJ FINSERV
HDB FINANCIAL SERVICES
श्री महावीर इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही.
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे, फोनः (02562) 229162, 235763


हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करून आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०